I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई विभाग, पहिली खबर क्र. ४६, वर्ष २०२२, दिनांक १६/१२/२०२२
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम - १९८८, कलमे Sections ७, १२
(ii) अधिनियम Act —, कलमे Sections —
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —

3. (a) अपराधाची घटना : वार मंगळवार, तारीख पासून २९/११/२०२२, वेळ १०:३०, तारीख पर्यंत १५/१२/२०२२, वेळ १६:३८
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख २९/११/२०२२, वेळ १०:३०
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........, तारीख ........, वेळ ........
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव कुलाबा पोलीस ठाणे व अक्षयतुल्य चहा टपरी जवळ, भाईंदरपाडा, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव
Address of Occurrence Name घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम), ठाणे if any Ward ४०० ६१५ Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name आशिष (b) वडीलाचे / पतीचे नाव प्रभाकर राणे
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ४६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ८८०९६८८०००
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक — दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय नोकरी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु, जात Caste मराठा, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता : गल्ली / सर्वे नं. घर / नाव नंबर फोन / मो. नंबर पॅन नं. वोटर्स नं.
२५०२, सी विंग, अटलांटिस, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई - ४०० ०७६.
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) वैभव दत्तात्रय पेडवार, वय ५१ वर्षे, धंदा - नोकरी (पद - सहा. पोलीस निरीक्षक, नेमणूक - कुलाबा पो. ठाणे) रा. ट्रि मी व्ह्यु टेरेस, १३ वुड हाऊस रोड, स्टेरलिंग सिनेमा समोर, कुलाबा, मुंबई ४०० ००५
२) विलास बुधाजी वांडकोळी, वय ३७ वर्षे, धंदा - नोकरी (पद - पो.ना.क्र. ०६१५७५, नेमणूक - कुलाबा पोलीस ठाणे) रा. ठि. बि. नं. ६६/१९७२, पंतनगर पोलीस वसाहत, घाटकोपर (पु) मुंबई ४०० ०७५

Scanned with OKEN Scanner

फिर्याद                    दि.

फिर्यादी श्री आशिष प्रभाकर राणे, वय ४६ वर्षे, धंदा - नोकरी, रा.ठि. २५०२, सी. विंग, अटलांटिस हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई - ४०० ०७६. यांचा सविस्तर जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो सोबत जोडण्यात आला असून तोच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात आली आहे.

समक्ष,

(मानसिंग वनवाले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

फिर्याद

दिनांक – १६/१२/२०२२

श्री. आशिष प्रभाकर राणे, वय– ४६ वर्षे, धंदा:– नोकरी , रा.ठी.– २५०२, सी विंग, अटलांटीस, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई. मोबा. क्रमांक ८८७९६८८०००

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मागील ४ महिन्यांपासुन रहावयास आहे. मी आयबीएम कंपनी, ठाणे येथे नोकरी करतो सदर नोकरीच्या पगारावर माझा उदरनिर्वाह चालतो.

माझेविरोधात कुलाबा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५४७/२२ कलम ३७६ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदरच्या गुन्हयाचे तपास अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. संजय ढोन्नर यांच्यानंतर सपोनि वैभव पेठकर यांचेकडे वर्ग झाला होता. तपास अधिकारी सपोनि श्री. वैभव पेठकर यांनी मला नमूद गुन्हयात मदत करतो म्हणून रु. १,००,०००/– चे लाचेची मागणी केली होती.

मला सपोनि वैभव पेठकर साहेब यांना पैसे दयावयाची इच्छा नसल्याने दि. २९/११/२०२२ रोजी मी त्यांचे विरुध्द तक्रार देणेकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे आलो. तेथील अधिकारी यांनी मला त्यांच्या वरिष्ठांकडे उभे केले. त्यांनी माझेकडे चौकशी करून वरिष्ठांनी पो.नि. वचकल यांची माझे तकारी बाबत कार्यवाही करणेकरीता नेमणुक केली.

पो.नि वचकल यांनी माझेकडे अधिक चौकशी करुन मला माझे तक्रारीबाबत लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. मला मराठी लिहीता येत नसल्याने मी स्वत: इंग्रजीमध्ये माझा तक्रारीअर्ज लिहुन दिला व त्यावर स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीसांनी त्यांचे कारवाईबाबतची सोपस्कर पुर्ण करुन दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पो.नि वचकल यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि वचकल यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि वचकल यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला. तसेच पो.नि वचकल यांनी सपोआ श्रीमती अडसुरे व पडताळणी पथकातील पो.ना.क्र.०३१२००/रावराणे यांचेशी ओळख करुन दिली व पो.नि वचकल यांनी तात्काळ पंचांसमक्ष कुलाबा पोलीस ठाणे या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान सपोनि वैभव पेठकर साहेबांनी माझेकडे रु. १,००,०००/– लाचेची मागणी केली.

त्यानंतर दि. ०९/१२/२०२२ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात आलो असता पो.नि. वचकल यांनी पडताळणीसाठी जाण्यापुर्वी पेठकर साहेब पोलीस ठाण्यात आहेत किंवा कसे? याबाबत खात्री करण्यासाठी पंचासमक्ष मी पेठकर साहेबांचे रायटर यांना फोन केला असता त्यांनी मला पेठकर साहेब हायकोर्टात गेले असल्याचे सांगितल्याने त्यादिवशी पेठकर साहेबांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी कुलाबा पोलीस ठाण्यात गेलो नाही.

त्यानंतर दि.१५/१२/२०२२ रोजी सकाळी १०:१३ वा. घोडबंदर रोड, भाईंदरवाडा, ठाणे येथे असतांना सपोनि पेठकर यांनी माझे मोबाईलवर मिस्ड कॉल आला असल्याचे मला दिसले. तेव्हा अंदाजे १०:५० वा. मी माझे मोबाईलवरुन सपोनि पेठकर यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता लोकसेवक सपोनि पेठकर यांनी लाचेची रक्कम घेण्यासाठी ते एक कर्मचारी पाठवित असल्याबाबत माझे लाईव्ह लोकेशन घोडबंदर रोड, भाईंदरवाडा, ठाणे हे

Scanned with OKEN Scanner

व्हॉटसअॅपव्दारे मागविले. व सदर लोकेशनवर आलेल्या कर्मचाऱ्यास लाचेची रक्कम देण्यास सांगितले.

त्यानंतर मी पो.नि. वचकल यांना पेठकर साहेबांनी लाचेची रक्कम घेण्यासाठी घोडबंदर रोड, ठाणे येथे कर्मचारी पाठविणार असल्याचे सांगितले असता पो.नि. वचकल यांनी ते पथकासह घोडबंदर रोड, ठाणे येथे येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मला मोबाईल क्र. ८१०८१५१५६५ यावरुन कॉल आला व त्यांना पेठकर साहेबांनी पैसे घेण्यासाठी पाठविले असल्याचे सांगितले.

त्यानंतर काही वेळाने पो.नि. वचकल हे पोलीस पथकासह पोलीस वाहनातुन डि मार्ट स्टोअर्सचे समोर, घोडबंदर रोड, ठाणे येथे आले. तेथे पो.नि. वचकल यांनी पंच व पथकाची मला ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि. वचकल यांनी मला पुन्हा पडताळणीच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सुचना दिल्या व मला कुलाबा पोलीस ठाण्यातुन लाचेची रक्कम घेण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यास भेटण्याकरीता स्वराज अमृतुल्य चहाचे टपरीजवळ, भाईंदर पाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प) येथे पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. गवंडे यांचेसह माझे कारने जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही अमृततुल्य चहाचे टपरीजवळ, भाईंदर पाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प) येथे कारने गेलो असता तेथे पोहोचल्यावर कर्मचारी याने त्याचे मोबाईल क्र. ८१०८१५१५६५ वरुन माझे मोबाईल क्र. ८८७९६८८००० वर व्हॉटसअॅप कॉल करुन स्वराज्य अमृततुल्य चहाचे टपरीसमोर उभा असल्याचे सांगितले. तेव्हा आलेल्या इसमाने त्यास सपोनि पेठकर साहेबांनी पाठविला असल्याचे सांगुन त्यांनी पेठकर साहेबांना कॉल केला. त्यावेळेस मी पेठकर साहेबांना माझे कडे एक लाख रुपये नसुन फक्त तीस हजार रुपये आहेत असे सांगितले असता त्यांनी नाराजी व्यक्त करुन सर्व रक्कम भेटेल या आशेने कर्मचारी पाठविला असल्याचे सांगितले. त्यावेळेस मी त्यांना थोडयावेळात मित्रांकडून गोळा करुन पन्नास हजार रुपये देईल असे सांगितले असता पेठकर साहेबांनी त्यास संमती दर्शविली व फोन कट केला.

त्यानंतर मी पो.नि. वचकल व पथक उभे असलेल्या ठिकाणी परत आलो असता पो. नि. वचकल यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यानंतर पो.नि. वचकल यांनी मला लाचेची रक्कम आणण्यास सांगितले असता मी डिमार्ट जवळील एटिएम मध्ये जावून तीस हजार घेवून आलो. तेव्हा पो.नि. वचकल यांनी लोकसेवक पेठकर साहेबांनी लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असुन कर्मचारी भांडकोळी याचेकडे देण्यास सांगितल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ३०,०००/— (रू. ५००/— दराच्या ६० भारतीय चलनी नोटा) स्वतःचे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना अॅंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अॅंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो. नि. वचकल यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम कारमध्ये स्विकारल्यास मला कारचे पार्किंग लाईट लावावे व लाचेची रक्कम कारचे बाहेर स्विकारल्यास डोक्यावरुन हात फिरवावा असा

समक्ष,

( मानसिंग वचकल )
पोलीस निरीक्षक,
लाचलचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगुन पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. वचकल यांचे सांगण्यावरुन चालक श्री. हडकर यांनी पोलीस वाहनातच पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व माझे शर्टचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. ढवण यांचेसह सापळा कारवाईकरीता लाचेची रक्कम घेणारा कर्मचारी भांडकोळी यांचे भेटीकरीता स्वराज्य चहाचे टपरीजवळ, भाईंदर पाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प) येथे माझे कारने पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी व पंच श्री.ढवण हे स्वराज्य चहाचे टपरीजवळ, भाईंदर पाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प) येथे पोहचलो असता लाच घेण्यासाठी आलेला कर्मचारी भांडकोळी हा माझी कार पाहताच माझे कारजवळ आला व कारमध्ये बसला. त्यानंतर मी लाच घेण्यासाठी आलेला कर्मचारी श्री. भांडकोळी याने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी पुर्वनिर्याजित इशारा केल्यानंतर तात्काळ पोलीस पथकाने भांडकोळी यांस रंगेहाथ पकडले. तेव्हा पो.नि. वचकल यांनी सदर इसमांस तेथे येण्याचे कारण व त्याचे नांव—पत्ता विचारले असता त्याने त्यांचे नांव विलास बुधाजी भांडकोळी, वय ३७ वर्षे, धंदाः— नोकरी (पो.ना.क्र.०६.१५७५) कुलाबा पोलीस ठाणे, रा.ठि. बि.नं.६६, रु.नं. १९७२, पंतनगर पोलीस वसाहत,घाटकोपर पुर्व, मुंबई ४०० ०७५ असे सांगून त्यास त्याचे पोलीस ठाण्याचे सपोनि वैभव पेठकर यांनी पैसे घेण्यासाठी पाठविल्याचे सांगितले. त्यानंतर रस्त्याचे बाजुला असलेल्या स्वराज्य चहाचे टपरीमध्ये सदर इसमांस नेवून त्याचे हातावर असलेली अॅन्थ्रॉसिन पावडर अल्ट्राव्हायलेट लाईटचे प्रकाशात पाहिली व त्याचेकडून त्याने स्विकारलेली लाचेची रक्कम पोलीस पथकाने हस्तगत केली.

तरी कुलाबा पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. वैभव पेठकर यांनी माझेवर दाखल गुन्हयात सहकार्य करण्याचे बदल्यात रु. १,००,०००/— लाचेची मागणी केली व त्यांचे सांगण्यावरुन पोलीस नाईक श्री. विलास भांडकोळी याने माझेकडून लाचेची रक्कमेचा पहिला हप्ता रु. ३०,०००/— स्विकारले म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे पेठकर साहेब व भांडकोळी यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून व समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( मानसिंग वचकल )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

... by the complainant/informant १५।१२।२०२२नंतर

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी श्री आशिष राणे यांचे विरुद्ध कुलाबा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्ह्यात त्यांना मदत करण्यासाठी बाजूस नमूद व वेळी यातील आलोसे वैभव पेठकर यांनी रु. १,००,०००/- ची लाचेची मागणी केली.

आज दि. १५/१२/२०२२ रोजी आलोसे वैभव पेठकर यांच्या सांगण्यावरुन आलोसे विलास भाडकोळी यांनी लाचेच्या मागणीतील रक्कम रु. ३०,०००/- चा पहिला हप्ता स्विकारल्यानंतर बाजूस नमूद ठिकाणी त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात ताब्यात घेतले म्हणून भ्र.प्र. अधि. १९८८, कलम ७, १२ मध्ये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक मानसिंग वन्सकल

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, —

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ............ Rank............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P.S ............, District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name मानसिंग ब. वन्सकल
पदनाम Rank पोलीस निरीक्षक,
तपासिक अं. चा कोड. क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
Posting
Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner